# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:21.01.2025** **वार:मंगळवार**

---

**ठळक बातम्या**

- अमेरिकेचे 47वे राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रंप यांनी घेतली शपथ;पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून ट्रंप यांना शुभेच्छा
- यंदाच्या प्रजासत्ताक दिन संचलनात भारतीय राज्यघटनेसंदर्भातील 2 विशेष चित्ररथ
- दिल्ली विधानसभेच्या 70 जागांसाठी 6 शे 99 उमेदवार रिंगणात

  आणि
- 19 वर्षाखालील महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना मलेशियाशी

**डोनाल्डट्रंप**

डोनाल्ड ट्रंप यांनी काल अमेरिकेच्या 47 व्या राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेतली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून ट्रंप यांनी दुसऱ्यांदा शपथ घेतली आहे. वॉशिंगटन डीसीच्या कपिटॉल रोटुंडामध्ये मुख्य न्यायाधीश जॉन रॉबर्ट्स यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. याच सोहळ्यात जे डी वेन्स यांना उपराष्ट्राध्यक्षपदाची शपथ देण्यात आली. राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेतल्या नंतर केलेल्या भाषणात ट्रंप यांनी इंधनांचे दर कामी करण्याच्या उद्देशानं राष्ट्रीय ऊर्जा आणीबाणी लागू केल्याची घोषणा केली. अमेरिकेत आता एका नव्या सुवर्ण युगाचा प्रारंभ होत आहे, अमेरिका प्रथम या संकल्पनेला आपलं प्राधान्य असेल असं ट्रंप म्हणाले. विविध देशांचे प्रमुख नेते या शपथविधी सोहळ्याला उपस्थित होते. भारताकडून परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस जयशंकर ट्रंप यांच्या शपथग्रहण सोहळ्यात सहभागी झाले होते . जगातल्या आघाडीच्या उद्योग समूहाच्या प्रमुखांनीही या सोहळ्याला हजेरी लावली. दरम्यान ट्रंप यांनी आपल्या दुसऱ्या कार्यकळाच्या पहिल्याच दिवशी अनेक महत्त्वाच्या आदेशांवर स्वाक्षऱ्या केल्या. मक्सिकोला लागून असलेल्या अमेरिकेच्या दक्षिणी सीमेवर राष्ट्रीय आणीबाणी लागू करण्याला ट्रंप प्रशासनाचं प्राधान्य आहे. या बाजूने होणाऱ्या घुसखोरीवर तत्काळ पायबंद घालण्यात येणार असल्याचं ट्रंप यांनी म्हटल आहे. दरम्यान , पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांना शुभेच्छा दिल्या आहेत . भारत आणि अमेरिका या दोन्ही देशांच्या हिताच्या दृष्टीने आणि जगाच्या भविष्याला नवा आकार देण्यासाठी राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांच्या बरोबर पुन्हा काम करण्यासाठी आपण उत्सुक आहोत अस पंतप्रधान मोदी यांनी आपल्या समाजमाध्यमावरील संदेशात म्हंटल आहे.

**पंतप्रधान परिषद**

केंद्रीय आदिवासी विकास मंत्रालयाच्या वतीने नवी दिल्लीत भारत मंडपम इथ आजपासून देशातल्या जिल्हयाधिकाऱ्यांची पंतप्रधान जनमन परिषदेच आयोजन करण्यात आल आहे . केंद्रीय आदिवासी विकास मंत्री जुएल ओराम आणि राज्यमंत्री दुर्गदास उइके हे या परिषदेला उपस्थित राहणार आहेत. पंतप्रधान जन मन अभियानाचा उद्देश शेवटच्या घटकपर्यंत विकास पोहचवणहे असून एकंदर सहा क्षेत्रांवर भर देण्यात आला आहे .

यामध्ये ग्रामीण भारतातील घरे आणि रस्ते , शाळा , पिण्याच्या पाण्याचा पुरवठा , अंगण वाड्यांच व्यवस्थापन आणि बहू उद्देशीय सुविधा केंद्रांची निर्मिती हा आहे . या परिषदेला देशातल्या 18 राज्यातील 88 जिल्हयानचे जिल्हाधिकारी  चर्चेत भाग घेणार असून , अजूनही  विकासापासून वंचित राहिलेल्या मागास  जिल्ह्यांच्या विकासा साठी एक कृती आराखडा ही या परिषदेत तयार केला जाणार आहे.

**प्रजासत्ताक दिन संचालन**

येत्या 26 जानेवारीला  प्रजासत्ताक दिनानिमित्त नवीदिल्लीत कर्तव्य पथावर होणाऱ्या शानदार संचलनाच्या कार्यक्रमात  भारताच  सांस्कृतिक वैभव आणि  भारतीय सैन्य दलाच कौशल्य  यांच दर्शन घडणार असून भारतीय राज्यघटने ला 75 वर्ष पूर्ण झाल्याच्या निमिताने विशेष 2  चित्ररथ सहभागी होणार आहेत. इंडोनेशियाचे राष्ट्रपती प्रबोवो सुबियांतो हे या संचलनाच्या कार्यक्रमाला  प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत . संरक्षण मंत्रालायचे सचिव राजेशकुमार सिंह यांनी काल नवीदिल्लीत पत्रकारांना ही माहिती दिली . यावर्षीच्या संचलनात इंडोनेशियाच्या 160 सैनिकांची  एक तुकडी आणि 190 जणांचे लष्करी बॅन्ड  पथक सहभागी होणार आहे.तसच भारतीय राज्यघटने ला 75 वर्ष पूर्ण झाल्याच्या निमिताने  या अनुषंगाने  देशाच्या विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे 31 चित्ररथ  सहभागी होणार आहेत . या कार्यक्रमासाठी देशभरातून 34 विविध क्षेत्रातील  10 हजार मान्यवरांना आमंत्रित करण्यात आल असून त्यामध्ये केंद्र सरकारच्या  कल्याणकारी योजनांची  यशस्वीपणे अमलबजावणी करणाऱ्या पुरस्कारप्राप्त गावांच्या सरपंचांचा ही समावेश आहे.

**पीठासीन अधिकारी परिषद**

विधीमंडळाच्या माध्यमातून देशातल्या नागरिकांची सेवा करण्याची महत्त्वाची जबाबदारी पीठासीन अधिकाऱ्यांवर आहे, असं प्रतिपादन लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी केलं. बिहारमध्ये पाटणा इथं आयोजित 85 व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेत ते काल बोलत होते. भारतीय राज्यघटनेची 75 वर्षे : घटनात्मक मूल्यांच्या बळकटीकरणासाठी संसद  आणि राज्य विधान मंडळांचं योगदान, या विषयावर परिषदेत विचारमंथन होत आहे. राज्य विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे आणि विधानसभा अध्यक्ष ॲडव्होकेट राहुल नार्वेकर यांच्यासह विविध राज्यांच्या विधीमंडळांचे अध्यक्ष आणि इतर अधिकारी या परिषदेत सहभागी झाले आहेत. भारतीय राज्यघटनेमुळेच भारताची जागतिक स्तरावर एक शक्तिशाली राष्ट्र म्हणून ओळख झाली आहे, असं राम शिंदे यावेळी म्हणाले.

**दिल्ली निवडणूक**

दिल्ली विधानसभेच्या 70 जागांसाठी येत्या 5  फेब्रुवारीला मतदान  होणार असून , काल यासाठी उमेदवारी अर्ज मागे घ्यायचा शेवटचा दिवस होता . त्यामुळे आता निवडणुकीच चित्र स्पष्ट झाल असून आगामी दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात  विविध पक्षांचे 6 शे 99 उमेदवार आपल नशीब अजमावणार आहेत. यामध्ये नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघात विविध पक्षांचे सर्वात जास्त 23 उमेदवार निवडणूक लढवत असून सर्वात कमी 5 उमेदवार पटेल नगर आणि कस्तुरबा नगर या विधानसभा मतदारसंघात निवडणुकीच्या रिंगणात आहेत . या निवडणुकी साठी 1 हजार 522 उमेदवारी अर्ज दाखल झाले होते, त्यातील 487 अर्ज अवैध ठरल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली. निवडणूक 5 फेब्रुवारीला होणार असून 8 फेब्रुवारीला मतमोजणी होईल.

**संवाद**

उत्तरप्रदेशात प्रयाग राज इथ सुरू असलेल्या महकुंभमेळयाबद्दल  सर्वंकष माहिती देण्यासाठी काल नवी दिल्लीत परराष्ट्र मंत्रालायचे  वरिष्ठ अधिकारी आणि उत्तरप्रदेशातील अधिकाऱ्यांनी परदेशातून वार्तांकन  करण्यासाठी आलेल्या विविध देशांच्या पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी महाकुंभ मेळ्याच  आध्यात्मिक , सांस्कृतिक आणि आर्थिक महत्व समजावून सांगितल . जगातील कोणत्याही मोठ्या जागतिक कार्यक्रमांच्या आयोजनात सर्वात जास्त सहभागी  होणाऱ्या नागरिकांपेक्षाही  जास्त नागरिक म्हणजेच सुमारे 45 कोटी नागरिक  यामध्ये सहभागी होत असून , या दृष्टीने या महकुंभ मेळयाच जागतिक महत्व अधोरेखित होत अशी माहिती  उत्तरप्रदेशच्या अधिकाऱ्यांनी यावेळी दिली

**बांगलादेशी घुसखोर**

मुंबईत  अभिनेता सै फ आली खान याच्यावर प्राणघातक हल्ला करणारा आरोपी बांगला देशी घुसखोर असल्याच निष्पन्न झाल्याच्या पार्श्वभूमीवर ठाणे पोलिसांनी अवैध पणे रहात असलेल्या बांगला देशीं विरुद्धची कारवाई जास्त तीव्र केली आहे .आतापर्यंत पोलिसांनी ठाणे, भिवंडी, कल्याण ,उल्हासनगर आणि वागळे इस्टेट  या 5 विभागातून 25 बांगला देशी घुसखोरांवर कारवाई करून त्यांना अटक केली आहे. मुख्यतः बांधकामाच्या ठिकाणी  आणि कामगार वसाहतींमध्ये  मध्ये ही कारवाई अधिक कडक करण्यात येणार असल्याच   ठाण्याचे उपआयुक्त अमरसिंग जाधव यांनी सांगितल

**अत्याधुनिक प्रयोगशाळा**

आत्मनिर्भर भारत योजनेअंतर्गत तयार केलेल्या उत्पादनांच्या स्वदेशी प्रणालींच्या चाचणीसाठी बेलापूर इथं एक अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात येत आहे. या प्रयोगशाळेचं भूमीपूजन इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव एस. कृष्णन यांच्या हस्ते काल झालं.आरोग्य, संरक्षण, अवकाश तंत्रज्ञान, आणि वैद्यकीय क्षेत्रातील स्वदेशी बनावटीची उपकरणं वापरण्याआधी त्यातील सर्व प्रणालीची चाचणी या प्रयोगशाळेत होणार आहे.

**पश्चिम बंगाल**

पश्चिम बंगालमधल्या आर जी कार वैद्यकीय महाविद्यालयात महिला डॉक्टरवर झालेल्या बलात्कार आणि हत्या प्रकरणातील आरोपी संजय रॉय याला कोलकत्याच्या सत्र न्यायालयानं जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. राज्य सरकारनं पीडीतेच्या कुटुंबियांना 17 लाख रुपये नुकसान भरपाई द्यावी असा आदेशही न्यायमूर्ती अनिर्बन दास यांनी दिला आहे. न्यायालयानं गेल्या शनिवारी संजय रॉयला दोषी ठरवलं होतं.

**महिला क्रिकेट**

मलेशिया इथ सुरू असलेल्या 20 षटकांच्या 19 वर्षाखालील महिला विश्वचषक क्रिकेट सामन्यांच्या मालिकेत आज अ  गटात भारतीय संघाचा सामना यजमान मलेशिया संघाशी होणार आहे. भारतीय वेळेनुसार क्वाललांपूर इथ आज दुपारी हा सामना खेळला जाणार आहे .दूसरा सामना श्रीलंका आणि वेस्ट इंडिज यांच्या आज होईल. दरम्यान, रविवारी झालेल्या सामन्यात भारतीय महिला संघाने वेस्ट इंडिजचा अवघ्या 4 षटकात  केवळ 44 धावांच्या बदल्यात  9 गडी राखून पराभव केला. भारतीय संघ सध्या अ  गटात 2 गुण मिळवून  सर्वात वरच्या स्थानावर आहे.

या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल , नमस्कार